प्रेसनोट दि. ११/०९/२०१८

## देशी बनावटीचे दोन पिस्टल व चार काडतुसे बाळगणाऱ्या दोन इसमांना गुन्हे शाखा, युनिट १ च्या टिमने केली अटक

गुन्हे शाखा, युनिट १ पुणे शहरचे अधिकारी व कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे शहरात भारत बंदचे अनुषंगाणे युनिट १चे हददीत खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना पोलीस नाईक सचिन जाधव यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एका इसमाकडे एक पिस्टल व काडतुसे असुन ते घेवुन तो शिंदे पूल चौक, शिवणे, पुणे समोरील सार्वजनिक रोडलगत, त्याचे जवळील अग्नीशस्त्र घेवून उभा असलेबाबतची खात्रीशिरपणे बातमी मिळाली. सदरची बातमी युनिट १चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव (अतिरीक्त कार्यभार) यांना कळविली असता, त्यांनी लागलीच कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले.

लागलीच युनिट १ कडील पोलीस उप निरीक्षक हर्षल कदम व स्टाफ यांनी सदर ठिकाणी जावून छापा टाकून बातमी प्रमाणे एका इसमांस ताब्यात घेवून त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पत्ता बालाजी लक्ष्मण शिरमेवाड, वय ३९ वर्षे, रा. फ्लॅट ए/१०८, तुषार रेसीडेंन्सी, शिंदे पुल, शिवणे, पुणे असे असलेचे सांगीतले. त्याचेकडे अधिक तपास करता त्याने त्याचे तोंड ओळखीचा मित्र नामे प्रतीक शामराव साठे, वय २२ वर्षे, रा. चंद्राई बिल्डींग, हनुमान मंदीरा समोर, पिंपळे निलेख, पुणे २ याचेकडे सुध्दा एक पिस्टल मिळून आले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जात प्रत्येकी एक देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे असा एकुण किं.रु. १,००,४००/- माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. शिरीष सरदेशपांडे सो. पोलीस उप आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख सो. सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, (अतिरीक्त कार्यभार), पो उप निरी. हर्षल कदम, पो.ना. सचिन जाधव, इम्रान शेख, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, सुभाष पिंगळे, सुधाकर माने, उमेश काटे, तुषार खडके, पो.शि. तुषार माळवदकर, यांनी केली आहे.